ePaper

**ग्रामीण भागातही इलेक्ट्रिक एसटी बस धावणार, 5 हजार गाड्या ताफ्यात दाखल**

| वर्ष - 8 । अंक - 298 | UDYAM-MH-26-0158827 |




महाईन्यूज ™

## आतील पानांत


- जितेशचा 'लगान' स्टाईल भन्नाट शॉट!
- अय्यरमुळे शुबमन गिलवर दबाव येतोय
- आसाममध्ये काँग्रेस नेतृत्वात बदल
- एलॉन मस्क यांचे वडील भारत दौऱ्यावर


www.mahaenews.com | गुरुवार, दि. 5 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## विजेत्यांचा जल्लोष, चाहत्यांचा आक्रोश : विराट विजयी मिरवणूकीत 35 जण गंभीर जखमी !

# बंगळुरुमध्ये क्रिकेटप्रेमींची चेंगराचेंगरी! 11 जण अक्षरश: कीडा-मुंगीसारखे मेले!

## 'विराट' जल्लोषाला गालबोट : काँग्रेस-भाजपमध्ये राजकारण सुरु!

**। बंगळुरू/ नवी दिल्ली । प्रतिनिधी । महाईन्यूज**

**'रॉयल चॅलेंजर्स ' ने 'आयपीएल- २०२५' चषक जिंकल्यानंतर संपूर्ण बंगळुरू शहरात गेले २४ तास जोरदार जल्लोष सुरू आहे. बंगळुरूने तब्बल १८ वर्षे वाट पाहून हा चषक जिंकला आहे. कर्णधार रजत पाटीदार, संपूर्ण देशाचा लाडका खेळाडू विराट कोहली आणि त्यांच्या संघाच्या सन्मानार्थ येथे विराट विजयी मिरवणूक काढून जल्लोष करण्याचे क्रिकेटप्रेमींनी ठरवले होते. पण, प्रत्यक्षात एवढी झुंबड उडाली, की जल्लोषाचे रूपांतर आक्रोशात झाले, प्रचंड चेंगराचेंगरी झाली आणि ११ क्रिकेटप्रेमी कीडामुंगीसारखे अक्षरशः चिरडून मृत्युमुखी पडले.**




### सरकारकडन चौकशीचे आदेश..

या दुर्दैवी घटनेनंतर कर्नाटक सरकारने चौकशीचे आदेश दिले असून जखमी ३५ जणांवर सरकारी खर्चाने उपचार सुरू आहेत. दरम्यान, मृतांच्या नातेवाईकांना सरकारतर्फे प्रत्येकी दहा लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे.

### राजकीय वातावरण तापले..

या दुर्दैवी घटनेनंतर सत्ताधारी काँग्रेस सरकार आणि विरोधी भारतीय जनता पार्टीचे नेते यांच्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून आरोप प्रत्यारोप सुरू आहेत. ढिसाळ नियोजन आणि विजयोत्सवाचे नियोजन करताना झालेल्या 'निष्काळजीपणा'चा आरोप करून भाजपाने सरकारला घेरले आहे.

### विजयाच्या सेलिब्रेशनला गालबोट..

उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी भाजपाचे सर्व आरोप खोडून काढले आहेत. तब्बल १८ वर्षांनंतर 'आयपीएल' च्या ट्रॉफीवर 'रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु' ने नाव कोरले. पण, चिन्नास्वामी स्टेडिअमच्या बाहेर बुधवारी झालेल्या विजेतेपदाच्या सेलिब्रेशनला गालबोट लागले.

**चिन्नास्वामी स्टेडियमची क्षमता 35 हजार, क्रिकेटप्रेमी लोटले दोन ते तीन लाख !**

प्रत्यक्षात या स्टेडियमची क्षमता ३५ हजार प्रेक्षकांची आहे आणि दोन लाखापेक्षा मोठा क्रिकेटप्रेमींचा महासागर लोटल्याने संपूर्ण परिस्थितीच आवाक्याबाहेर गेल्याचे त्यांनी मान्य केले.

### चाहत्यांच्या उत्साहाला सीमा नाही..

या विजयोत्सवात सामील होण्यासाठी आलेल्या चाहत्यांमधील उत्साहाला सीमा राहिलेली नव्हती. लाडक्या विराट कोहलीच्या आणि आपल्या टीमच्या विजयाचा जल्लोष करण्यासाठी चिन्नास्वामी स्टेडिअमच्याबाहेर लाखो चाहत्यांची मोठी गर्दी जमली होती. चाहत्यांचा उत्साह हाताबाहेर गेला, गर्दीमुळे प्रचंड चेंगराचेंगरी झाली आणि ११ जणांना प्राण गमवावे लागले.

### निष्काळजीपणाचा आरोप

भाजपाने कर्नाटकातील काँग्रेस सरकारवर 'घोर निष्काळजीपणा' केल्याची टीका केली आहे. तर डी. के. शिवकुमार यांनी मात्र चेंगराचेंगरीनंतर जल्लोषाचा कार्यक्रम सुरु राहण्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. त्यांनी म्हटले की, विजयीवीरांच्या सत्काराचा कार्यक्रम केवळ १० मिनिटांपर्यंत मर्यादित करण्यात आला आहे.

### मृतांची नेमकी संख्या माहीत नाही..

डी. के. शिवकुमार म्हणाले, की मी पोलिस आयुक्त आणि सर्वांशी बोललो आहे. मी नंतर रुग्णालयातही जाईन. रुग्णांची काळजी घेणाऱ्या डॉक्टरांना मी त्रास देऊ इच्छित नाही. मृतांची नेमकी संख्या आता सांगता येणार नाही. आम्ही लोकांना शांत राहण्याचे आवाहन करतो आहे. आम्ही कार्यक्रम कमी केला. कार्यक्रम १० मिनिटांत संपला. आम्ही सर्वकाही सामान्य करण्याचा प्रयत्न करत आहोत. शासन पूर्णपणे सज्ज आहे. भाजपाने केलेल्या टीकेलाही शिवकुमार यांनी प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले, ते आरोप करण्यासाठीच आहेत आणि आम्ही संरक्षणासाठी आहोत. आता मी रुग्णालयात जात आहे.

### मुख्यमंत्री सिद्धरामय्या काय म्हणाले ?

चेंगराचेंगरीच्या घटनेनंतर मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी पत्रकार परिषदेत संवाद साधला. यावेळी सिद्धरामय्या यांनी म्हटले आहे की, चिन्नास्वामी स्टेडियमची आसन क्षमता ३५ हजार आहे. मात्र, या ठिकाणी तब्बल २ ते ३ लाख क्रिकेटप्रेमी स्टेडियममध्ये जमा झाले होते. अशा प्रकारची घटना घडेल, असे कोणालाही वाटले नाही. मात्र, या घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी १० लाख रुपये भरपाई देण्यात येईल. तसेच जखमींना मोफत उपचार देण्याचे आदेशही दिले आहेत, असेही मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी सांगितले आहे.

# शरद पवार गटाची रात्री उशिरा बैठक!

## वर्धापन दिन स्वतंत्रपणेच साजरा होणार; एकत्रीकरणाच्या चर्चांना तूर्तास ब्रेक!

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन गटांच्या संभाव्य एकत्र येण्याच्या चर्चांना तूर्तास ब्रेक लागला आहे. शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाने रात्री उशिरा घेतलेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत पदाधिकाऱ्यांना स्पष्ट संदेश दिला आहे – येत्या १० जून रोजी होणारा वर्धापन दिन आपण स्वतंत्रपणे साजरा करणार आहोत.**



**या निर्णयामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट – शरद पवार आणि अजित पवार – पुण्यातच स्वतंत्रपणे आपापला वर्धापन दिन साजरा करणार आहेत. त्यामुळे दोन्ही गटांचे शक्तिप्रदर्शन एकाच शहरात होणार असून, या पार्श्वभूमीवर राजकीय वर्तुळात नवे समीकरण तयार होण्याची शक्यता चर्चेत आहे.**

### पुण्यात मोठा मेळावा

शरद पवार गटाची तयारी जोरात शरद पवार गटाने पुण्यातील एका मोठ्या सभागृहात वर्धापन दिन कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या मेळाव्यात आमदार, खासदार आणि पक्षाचे प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी होणार असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची रणनिती यावेळी ठरवली जाणार आहे. यामुळे या कार्यक्रमाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिले आहे.

### काका-पुतण्याच्या भेटींनी दिला गोंधळाला ऊत

शरद पवार आणि अजित पवार यांच्यातील अनेक अलीकडील भेटींमुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता.

काही दिवसांपूर्वी दोघे साखर संकुल येथे एका कार्यक्रमात एकत्र आले होते. त्याआधी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, रयत शिक्षण संस्था, तसेच जय पवार यांच्या साखरपुडा कार्यक्रमातही दोघे एकत्र होते. या भेटींमध्ये हास्यविनोद आणि सौहार्दाचे वातावरण दिसून आल्याने ‘दोन्ही गट एकत्र येणार का?’ अशी चर्चा पुन्हा रंगली होती.

### राजकीय उलथापालथ

“याबाबत सुप्रिया आणि अजित निर्णय घेतील,” या वाक्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली. मात्र, याच मुद्द्यावर विचारले असता, त्यांनी “कल्पना नाही” असे सांगून विषय टाळला. अजित पवार यांनीही स्पष्ट केले की, “अशी कोणतीही चर्चा नाही.” यावर पत्रकारांनी अधिक विचारणा केली असता, ते उत्तर न देता निघून गेले. सध्या तरी एकत्रीकरणाला ब्रेक सध्या तरी शरद पवार आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी गटांमध्ये एकत्र येण्याची शक्यता धूसर झाली आहे. वर्धापन दिन वेगळा साजरा करण्याचा निर्णय घेतल्यामुळे ही शक्यता लांबणीवर गेली आहे. मात्र, आगामी राजकीय घडामोडींवर सर्वांचे लक्ष राहणार हे निश्चित!

# नदीच्या जैवविविधतेवर अतिक्रमणाचा विळखा!

## विकासाच्या नावाखाली अतिक्रमण; पुण्यातील नद्यांची श्वास घेण्याची धडपड...

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**एकेकाळी दाट वृक्षराजी आणि संपन्न जैवविविधतेचे प्रतीक असलेल्या पुण्यातील मुळा-मुठा नद्या आज शहरीकरणाच्या ओझ्याखाली विवश झाल्या आहेत. जागतिक पर्यावरणदिनी (५ जून) या नद्यांच्या परिसरातील नष्ट होत चाललेल्या जैवविविधतेचे विदारक वास्तव समोर आले आहे. एकेकाळी मुळा-मुठा नदीत सहज आढळणारे देशी मासे महाशिर, तसेच चित्रबलाकसारखे दुर्मीळ पक्षी आता नामशेष होण्याच्या वाटेवर आहेत.**




बांधकामसामग्री, सिमेंटच्या गोण्या, जेसीबी आणि ट्रक यांच्या गोंगाटात नदीकिनारे ‘सुशोभित’ होण्याचा प्रयत्न होतोय, पण त्यातून स्थानिक जैवविविधतेचा अस्तच होत आहे. वाकडसारख्या भागात सुरू असलेल्या वेगवान विकासामुळे स्थानिक झाडे, छोटे प्राणी, कीटक, वनस्पतींची नष्ट होण्याची प्रक्रिया अधिक तीव्र झाली आहे.

**पर्यावरण अभ्यासक प्राजक्ता महाजन सांगतात**

“नदीकाठच प्राणी-पक्ष्यांचा उरलेला शेवटचा अधिवास आहे. झाडे काढून त्याजागी कृत्रिम उद्याने, फूड कोर्टसारख्या रचना करणे चुकीचे आहे. विकास नको, असे नाही; पण तो पर्यावरणपूरक असायलाच हवा.”

नदी म्हणजे केवळ पाणी नव्हे, ती एक परिसंस्था ‘जीवित नदी प्रकल्पा’च्या शैलजा देशपांडे यांचे स्पष्ट मत आहे –

“नदी कोणाच्या मालकीची नाही, आपण तिचे राखणदार आहोत. नदीसुधार प्रकल्पांच्या नावाखाली झाडांची कत्तल थांबवायला हवी. नागरिकांचा विकास आणि नदीचे संवर्धन यामध्ये संतुलन साधणे गरजेचे आहे.”

त्याचप्रमाणे, नद्यांचे जिवंत झरे भूजल पुनर्भरणात मोलाची भूमिका बजावतात. नदीकाठची झाडे तापमान नियंत्रित करतात, वायुप्रदूषण कमी करतात. वटवाघुळ, मधमाश्या, डासांवर नियंत्रण करणारे कीटक इत्यादी जैवसाखळीतील घटक नदीपात्रांमुळेच टिकून आहेत.

### कोणती जैवविविधता आहे धोक्यात?

प्रदेशनिष्ठ वृक्षप्रजाती : वाळूंज, धेडउंबर, पाणीजांभूळ, शिंदी, नागरमोथा.

दुर्मीळ वनस्पती:

रानतुळस, पाणलवंग

**प्राणी-पक्षी :** महाशिर मासा, चित्रबलाक, ब्राह्मणी डक, खंड्या, कोतवाल, स्वर्गीय नर्तक, उंदीर, साप, पतंगांचे विविध प्रकार

कीटक आणि पृष्ठवंशीय जीव:

डासांच्या अळ्या खाणारे कीटक, मधमाश्या, वटवाघुळे इ.

**शेवटची हाक :** विकास हवेच, पण हरित विचारांसह पुण्याच्या नद्यांवर संकटाचं सावट गडद होत चाललं आहे. ‘विकास’ाच्या नावाखाली निसर्गाचा नाश होऊ नये, यासाठी शहरात एकजूट होऊन पर्यावरणसंवर्धनासाठी प्रयत्न करण्याची आज गरज आहे.

### ‘पर्यावरणदिनी’ पुणेकरांचा जागर

पर्यावरण रक्षणासाठी पुणेकर आपल्या पद्धतीने आवाज उठवत आहेत. राम-मुळा संगमावरील चिपको आंदोलन, सोनम वांगचुक, सयाजी शिंदे यांची उपस्थिती, आणि पुणे रिव्हर रिवायव्हल, जीवित नदी प्रकल्प यांसारख्या संस्थांचा सहभाग यामुळे ही चळवळ अधिक बळकट झाली आहे. पर्यावरणतज्ज्ञ गुरुदास नूलकर सांगतात,“नदीकाठची जैवविविधता नष्ट झाली, की पाणी शुद्धीकरण, भूजल पुनर्भरण आणि तापमान नियंत्रण यांसारख्या परिसेवा थांबतात. परिणामी, नदीची नैसर्गिक पुनरुज्जीवन क्षमता कमी होते.”

## आरटीओचे दुर्लक्ष, खासगी बसचे भाडे दामदुपट्ट

# पिंपरी चिंचवडमधील प्रवाशांची 'सरकारमान्य' लूट

## बसच्या मनमानी भाड्यामुळे प्रवाशांच्या खिशाला चाट

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**सुट्ट्यांचा हंगाम सुरु झाला की, नागरिकांना मूळ गावी जाण्याचे किंवा नातेवाईकांना भेटण्यासाठी अथवा पर्यटनाला जाण्याचे वेध लागतात. ह्या काळात रेल्वेला असलेली गर्दी, प्रतीक्षा यादी बघता सामान्य नागरिक हा खासगी प्रवासी बसद्वारे प्रवासाला प्राधान्य देतो. मात्र ,नेमकी प्रवाश्यांची ही गरज ओळखून खासगी बस मालकांनी प्रचंड भाडेवाढ केली आहे. यातून ग्राहकांची पिळवणूक आणि लूटमार सुरू आहे.**



दरम्यान, जास्त भाडे आकारणी करणाऱ्या बसचालक, मालक आणि कंपन्यांविरुद्ध कारवाई करण्यात आरटीओ आखडता हात घेत असल्याने प्रवाशांची चक्क 'सरकारमान्य' लूट सुरू आहे.पिंपरी-चिंचवड ही कामगार, कष्टकऱ्यांची नगरी म्हणून ओळखली जाते. राज्याच्या तसेच परराज्यातील कानाकोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने चाकरमानी उद्योगनगरीत वास्तव्यास आहेत. दिवाळी तसेच उन्हाळ्यात मुलांना शाळेला सुटी लागत असल्याने अनेक जण कुटूंबासह गावी जाण्यास प्राधान्य देतात. शहरातून मूळगावी जाणाऱ्या प्रवाशांमध्ये विदर्भ आणि मराठवाड्यातील प्रवाशांची संख्या अधिक आहे. मुख्यत्वे दिवाळी आणि उन्हाळी सुट्टीच्या काळात ही संख्या खूप मोठी असते. उन्हाळी सुट्टीच्या पार्श्वभूमीवर रेल्वेचे बुकिंग फुल्ल झालेले आहे. एसटी महामंडळाकडेही प्रवाशांची गर्दी असते. त्यामुळे प्रवाशांना खासगी ट्रॅव्हल्स हाच पर्याय शिल्लक असतो.

मात्र, याच संधीचा खासगी प्रवासी वाहतुक करणारे गैरफायदा उठवतात. शहरातून दररोज सुमारे पाचशेहून अधिक खासगी बस राज्याच्या विविध भागात जातात. या व्यतिरिक्त मुंबईहूनही मोठ्या संख्येने खासगी बस पुण्यातून पुढे मार्गस्थ होतात. ट्रॅव्हल्स चालकांकडून या काळात मोठ्या प्रमाणात तिकीट दर वाढवले जातात. काही ठिकाणी तिकीट दरामध्ये दुप्पट, तिप्पट वाढ केली जाते. ही वाढ प्रवाशांच्या खिशाला चांगलाच चाट लावत आहे. प्रवाशांची संख्या वाढण्याच्या काळात बसचे भाडे वाढविण्याचे प्रकार होतात. त्यामुळे प्रवाशांना मोठा भुर्दंड बसत आहे. त्यामुळे सुटीच्या काळात गावी जावे की नाही असा प्रश्न सर्वसामान्यांना भेडसावत आहे. उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत खासगी प्रवासी बसची वाहतूक पथकामार्फत तपासणी करावी. तिकीट बुकिंग काउंटरवरदेखील जाऊन तपासणी व्हावी. गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर कारवाई केली जावी. भाडेवाढीमुळे प्रवाशांना विनाकारण भुर्दंड सहन करावा लागत आहे. या त्रासापासून सुटका होऊन नागरिकांची होणारी लूटमार थांबवावी, अशी मागणी प्रवाशांमधून केली जात आहे.

### सरकारच्या कमाल दराकडे दुर्लक्ष

खासगी प्रवासी बसला एसटी बसच्या प्रतिकिलोमीटर भाडेदाच्या दीडपट भाडे आकारता येते. याबाबतचे कमाल भाडे सरकारने निश्चित केले आहे. हे दीडपट दर केवळ उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत असतात. काही खासगी प्रवासी बस सणासुदीच्या व गर्दीच्या हंगामामध्ये प्रवाशांकडून मनमानी भाडे आकारतात. मात्र, जास्त भाडे आकारणाऱ्या खासगी बसवर आरटीओ आणि वाहतूक पोलिसांकडून कोणतीही कारवाई होताना दिसत नाही. त्यामुळे खासगी आराम बस चालकांच्या मनमानीत वाढ होत आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बसमालकांवर आरटीओने कारवाई करणे गरजेचे आहे.

---

## बचत गटांच्या महिलांकडून मालमत्ता कर बिलांचे वाटप!

## मालमत्ताधारकांनी सहकार्य करावे : पिंपरी-चिंचवड पालिका प्रशासनाचे आवाहन

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने २०२५-२६ या आर्थिक वर्षातही महिला बचत गटाच्या मार्फत बिलांचे वाटप सुरू करण्यात आले आहे. तरी बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.**




पिंपरी-चिंचवड शहरात ६ लाख १५ हजार ८६३ नोंदणीकृत मालमत्ता आहेत. त्यानुसार सर्वच बिलांची छपाई होऊन बिले वाटप करण्यास सुरुवात झाली आहे. महिला बचत गटातील महिलांच्या माध्यमातून मिळकतकर बिले घरोघरी पोहोचवण्याची जबाबदारी महानगरपालिकेने महिला आर्थिक विकास महामंडळावर सोपवली आहे. बिल वाटप करण्यात येणाऱ्या महिलांना महानगरपालिकेच्या वतीने ओळखपत्र ही देण्यात आले आहे. ३१ मे पर्यंत सर्व बिलांचे वितरण करण्याचे नियोजन महानगरपालिकेने केले आहे. तरी नागरिकांनीही बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. मालमत्ता कर भरण्याची ऑनलाइन सुविधा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आर्थिक वर्ष २०२५-२६ ची मालमत्ता कर बिले ऑनलाइन प्रसिद्ध करण्यात आली असून, करदात्यांना त्यांच्या नावावर नोंद असलेल्या मालमत्तांची बिले www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर पाहता व भरता येतील. तसेच मालमत्ता कर बिले ३० जूनपर्यंत ऑनलाईन पद्धतीने बिले भरल्यास सामान्य करावर १० टक्के सवलत मिळणार आहे.

> बचत गटांच्या महिलांमार्फत मालमत्ता कर बिलांचे वाटप सुरू झाले आहे. यामुळे बचत गटांच्या महिलांच्या आर्थिक सक्षमतेस बळकटी मिळणार आहे. तसेच नागरिकांपर्यंत वेळेवर बिले पोहोचवण्याच्या उद्देशालाही चालना मिळणार आहे. नागरिकांनी देखील बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे.
>
> - शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

> पिंपरी चिंचवड महानगरपालिका मालमत्ता कर विभागाचे बिल वाटप महिला बचत गटांच्या महिलांमार्फत करण्यात येत आहे. ३० जून २०२५ पर्यंत कर भरल्यास मालमत्ताधारकांना विविध सवलतींचा लाभ घेता येणार आहे. तरी जास्तीत जास्त मालमत्ताधारकांनी लवकरात लवकर कर भरून सवलतींचा लाभ घ्यावा.
>
> - प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### परमार्थात अभिमान आड येतो.

शास्त्रात दोन गोष्टी सांगितल्या आहेत : इहलोक आणि परलोक कसे साधावेत हे दोन्ही स्पष्ट केले आहे. परंतु आपण प्रपंच तडीचा आणि परमार्थ सवडीचा मानतो. या दोन्ही गोष्टींत जाणत्याची संगत लागते. परलोक साधून देणाऱ्याला सद्गुरू म्हणतात. जो मनुष्य आपल्याला कळत नाही हे कबूल करतो, त्यालाच सद्गुरूकडे जाण्याचा रस्ता मोकळा होतो. आपण भगवंताला शरण जात नाही, कारण आपला अभिमानच या शरण जाण्याच्या आड येतो. गंमत अशी की, व्यवहारात सुद्धा आम्ही अभिमान सोडून, ज्याला जे समजते त्याच्याकडे जातो. इहलोक अनुभवाचा आणि परलोक अनुमानाचा, अशी आपली कल्पना असते. पण इहलोकाचा अनुभव दुःखाचा येतो तरी तो आम्ही सोडत नाही, मग 'परमार्थाचा अनुभव नाही म्हणून मी तो करीत नाही ' हे म्हणणे लबाडीचे आहे. ' प्रपंचात आम्ही काही पाप करीत नाही, मग परमार्थ तरी दुसरा कोणता राहिला ? ' असे काहीजण विचारतात. प्रपंच सचोटीचा असला, तरी त्यात अभिमान असेल तर नाही तो परमार्थ होणार. ' राम कर्ता ' म्हटल्याशिवाय, म्हणजेच अभिमान सोडल्याशिवाय, परमार्थ नाही साधणार. ' मी देही ' म्हणू लागलो यात अभिमान आला. देहबुद्धीला कारण म्हणजे वासना. वासना हे सर्वांचे मूळ आहे. ' माझा जन्मच जर वासनेत आहे तर ती बाजूला काढल्यावर आम्ही जिवंत कसे राहू ? ' असे वाटते. जो या वासनेचा खून करतो, तोच परमार्थाला लायक होतो. अंती जी मती, ती जन्माला कारण होते. हे सगळे ज्ञानाचे बोलणे झाले, पण प्रचीतीने हे सर्व जाणावे. बायकोपोरांचा त्रास होतो, मन एकाग्र होत नाही, म्हणून बुवा झाला; मठ केला. लोक येऊ लागले, त्यांना जेवायला घालण्याकरिता भिक्षा आणू लागला. पण भगवंत सर्वांना खायला घालतो हे विसरला ! छप्पर गळू लागले ते नीट करण्याचीच काळजी करू लागला. मग घरादारांनी काय केले ? असा बुवा होण्यापेक्षा प्रपंचातच राहिलेले काय वाईट ! थोडक्यात म्हणजे, परमार्थ समजून जो त्याचे आचरण करील, त्याला तो लवकर साधेल. त्या माणसाला प्रपंच सोडून जायचे कारणच उरणार नाही. जगातले आपले समाधान अगर असमाधान, ज्या वृत्तीने आपण जगाकडे पाहतो त्यावर अवलंबून आहे. परमार्थात महत्त्व, बाहेरचे ऐश्वर्य किती आहे याला नसून, वृत्ती स्थिर होण्याला आहे; आणि भगवंताचे सतत अनुसंधान हाच वृत्ती स्थिर होण्याचा एकमेव उपाय आहे.

**बोधवचन:- परमार्थाला कोणतीही परिस्थिती चालते. आपली वृत्ती मात्र स्थिर असली पाहिजे.**



## 'स्टेट'मेंट


अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक


# 'इंडिया आघाडी' तील 16 पक्षांचे 'सवते सुभे' !

**पाकिस्तानच्या विरोधात मोदी सरकारने हाती घेतलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' ची कारवाई कशी खोटी होती, कशी अपयशी झाली, हे पटवून देण्यासाठी आणि जनतेमधून उठाव करण्यासाठी सोळा विरोधी पक्षांच्या 'इंडिया आघाडी' ची बैठक आयोजित केली खरी, पण सोळा पक्षांची तोंडे सोळा दिशांना झाल्याने आणि प्रत्येकाने 'सवते सुभे' मांडल्याने या आघाडीमध्ये महाबिघाडी झाल्याचे चित्र विरोधी कार्यकर्त्यांमध्ये गेले असून काही डागडुजी करता येते का, यासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत.**



### शरद पवारांचे घुमजाव..

या 'इंडिया आघाडी' तील एक घटक पक्ष असणाऱ्या राष्ट्रवादीने काढता पाय घेतला असून 'त्या' निवेदनावर शरद पवारांची सहीच नाही, असे सांगण्यात येते. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्थापन झालेली ही इंडिया आघाडी एकाच वर्षात तुटताना दिसत आहे. 'आप' चे प्रमुख अरविंद केजरीवाल यांच्यानंतर राष्ट्रवादीचे प्रमुख शरद पवार या आघाडीपासून दूर जात आहेत, तर तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी मात्र जवळ येत असल्याचे चित्र आहे.

### विशेष अधिवेशनाची मागणी..

'ऑपरेशन सिंदूर' च्या पार्श्वभूमीवर संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्यासाठी काँग्रेसच्या नेतृत्वाखाली या आघाडीची नवी दिल्लीत बैठक झाली. या बैठकीला १६ विरोधी पक्षांचे नेते उपस्थित होते. परंतु शरद पवार आणि केजरीवाल यांच्या पक्षातील कोणीही उपस्थित नव्हते. तर दोन हात लांब राहणाऱ्याममता बॅनर्जी यांच्या टीएमसी पक्षाचे खासदार डेरेक ओ'ब्रायन यांनी हजेरी लावली.

### नरेंद्र मोदींच्या धोरणाचा विरोध..

मोदी सरकारच्या विरोधात मोठे आंदोलन उभारण्याच्या इराद्याने आयोजित 'इंडिया आघाडी'च्या बैठकीत १६ विरोधी पक्षांचे नेते उपस्थित होते. यावेळी काँग्रेस, टीएमसी, डीएमके, सपा, उद्धव ठाकरे गट, आरजेडी, नॅशनल कॉन्फरन्स, जेएमएम, सीपीएम, सीपीआय, इंडियन युनियन मुस्लिम लीग, आरएसपी, व्हीएसपी, केरळ काँग्रेस, एमडीएमके आणि सीपीआय या पक्षांच्या नेत्यांनी भाग घेतला. यावेळी सविस्तर चर्चा होऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून पहलगाम दहशतवादी हल्ला, 'ऑपरेशन सिंदूर' आणि अमेरिकेने घोषित केलेल्या 'युद्धविराम' या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची विनंती केली.

### केजरीवाल, शरद पवार आघाडीपासून दूर..

संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याच्या मागणीला दोन महत्त्वाचे विरोधी पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस आणि आम आदमी पक्ष यांनी विरोध केला आहे. शरद पवार यांच्या पक्षाने पत्रावर स्वाक्षरी केली नाही. या आघाडीत आकार देणाऱ्या नेत्यांमध्ये शरद पवार यांचे नाव समाविष्ट होते. त्यानंतरही शरद पवार बैठकीला उपस्थित राहिले नाहीत. त्यांनी पूर्वीच आपली भूमिका स्पष्ट केली असून विशेष अधिवेशनाची गरज नाही असे म्हटले आहे. भारताची युद्धनीती, राजनीति आणि कूटनीती सभागृहात चर्चिली जाऊन जगापुढे मांडायची का, असा त्यांचा सवाल आहे.

### उबाठा गटाची भूमिका काय?

शरद पवार यांच्या अनुपस्थिती बाबत विचारता उबाठा गटाचे नेते संजय राऊत म्हणाले की, लोकसभेतील राष्ट्रवादीच्या नेत्या सुप्रिया सुळे आहेत, त्या परदेशात गेलेल्या प्रतिनिधी मंडळाचा भाग असल्याने त्या देशात नाहीत. शरद पवारही आमच्यासोबत आहेत.

### शरद पवारांच्या मनात काय?

संजय राऊत यांनी निश्चितच शरद पवार हे त्यांच्यासोबत आहे, हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु शरद पवार यांनी विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी आधीच फेटाळून लावली आहे. शरद पवार यांनी स्पष्ट म्हटलं होतं की, हा एक संवेदनशील आणि गंभीर मुद्दा आहे. संसदेत इतक्या गंभीर विषयावर चर्चा करणे शक्य नाही. अशा परिस्थितीत राष्ट्रीय हितासाठी माहिती गुप्त ठेवणे आवश्यक आहे, संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याऐवजी आपण सर्वांनी सर्वपक्षीय बैठक घेतली, तर बरे होईल.

### मोदींची ताकद वाढतच आहे..

गेल्या लोकसभा निवडणुकीत सर्व विरोधी पक्षांना एकत्र करून शरद पवार यांनी पाहिले आहे की पंतप्रधान मोदी राजकीयदृष्ट्या कमकुवत होऊ शकतात, परंतु सध्या 'एनडीए' ला सत्तेवरून काढून टाकणे सोपे नाही. मोदींची ताकद वाढताना दिसत आहे. अलिकडच्या काळात शरद पवार आणि त्यांचे पुतणे अजित पवार यांच्यात अनेक बैठका झाल्या आहेत. तेव्हापासून काका-पुतणे एकत्र येण्याबाबत अटकळ बांधली जात आहे. जर शरद पवार आणि अजित पवार एकत्र आले तर सुप्रिया सुळे यांचा केंद्रात मंत्री होण्याचा मार्गही मोकळा होऊ शकतो. अशा परिस्थितीत 'ऑपरेशन सिंदूर' आणि युद्धबंदीच्या मुद्द्यावर शरद पवार मोदी सरकारसोबत उभे असल्याचे दिसून येत आहे.

### केजरीवालांनी संबंध तोडले..

'आम आदमी पक्षा' ने ऑपरेशन सिंदूर आणि युद्धबंदीच्या मुद्द्यावर मोदी सरकारविरुद्ध कडक भूमिका घेतली आहे. संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणीही ते करत आहेत, जेव्हा इंडिया आघाडीने या मुद्द्यावर बैठक बोलावली होती, तेव्हा आम आदमी पक्ष उपस्थित राहिला नाही. 'आप' ने लोकसभा निवडणुकीपासून काँग्रेसच्या नेतृत्वाखालील आघाडीशी संबंध तोडले आहेत. त्यामुळे दिल्लीत असूनही केजरीवाल बैठकीला उपस्थित नव्हते. दिल्ली निवडणुकीत झालेल्या


**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# तिसऱ्या मध्यस्थाची गरज नाही

## दोघांकडे एकमेकांचे मोबाइल नंबर आहेत : अंधारे





।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**एप्रिल महिन्यात राज ठाकरेंनी महेश मांजरेकर यांना एक मुलाखत दिली होती. या मुलाखतीत त्यांनी उद्धव ठाकरेंना 'टाळी' देण्याचे संकेत दिले होते. ज्यानंतर उद्धव ठाकरे यांनीही तातडीने प्रतिसाद देत टाळीला हाळी देण्याची भाषा केली होती. त्यानंतर दोन्ही नेते विदेश दौऱ्यावर गेले. त्या कालावधीत मनसे आणि शिवसेना ठाकरे गट यांच्या युतीच्या काहीशा थंडावल्या होत्या. आता पुन्हा या चर्चा सुरु झाल्या आहेत. दरम्यान सुषमा अंधारेंनी एक महत्त्वाचं वक्तव्य केलं आहे. उद्धव ठाकरे यांना युतीबाबत विचारलं असता ते काय म्हणाले हे सुषमा अंधारेंनी सांगितलं आहे.**

१९ एप्रिलच्या मुलाखतीत महेश मांजरेकर यांनी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे अजूनही एकत्र येऊ शकतात का? असा थेट सवाल महेश मांजरेकर यांनी राज ठाकरे यांना विचारला. त्यावर राज ठाकरे म्हणाले, “कोणत्याही मोठ्या गोष्टींसमोर आमच्यातील वाद, भांडणं किरकोळ आहेत. महाराष्ट्र खूप मोठा आहे. मराठी माणसाच्या अस्तित्त्वासाठी या गोष्टी अत्यंत शुल्लक आहेत. एकत्र येणं, एकत्र राहणं यात फार कठीण गोष्ट वाटत नाही. विषय फक्त इच्छेचा आहे, कारण हा माझ्या एकट्याचा विषय नाही. माझं म्हणणं आहे की सर्व राजकीय पक्षातील सर्व मराठी माणसांनी एकत्र येऊन एकच पक्ष काढावा.” असं राज ठाकरे म्हणाले होते.राज ठाकरेंनी साद दिल्यानंतर उद्धव ठाकरेंनीही त्यावर प्रतिक्रिया दिली. “आमच्यात भांडण नव्हतंच, पण तरीही आमच्यातील भांडणं मिटवून टाकल्याचं मी जाहीर करतो.

त्यावेळेला सर्व मराठी माणसांनी ठरवायचं की भाजपाबरोबर जायचं की माझ्याबरोबर यायचं. मग काय द्यायचाय त्या तो पाठिंबा बिनशर्त द्या. महाराष्ट्राचं हित ही एकच माझी अट आहे”, असं उद्धव ठाकरे म्हणाले होते. त्यानंतर विविध वक्तव्य समोर आली. आता सुषमा अंधारे यांनी राज ठाकरेंसह युतीबाबत उद्धव ठाकरे काय म्हणाले ते सांगितलं आहे.दोघं भाऊ आहेत, दोघांकडे एकमेकांचे मोबाइल नंबर आहेत. त्यांना कुठल्याही तिसऱ्या मध्यस्थाची गरज नाही. जेव्हा कधी वाटेल ते मोबाइलवरुन बोलतील आणि एकत्र येतील. तरीही मनसेच्या लोकांकडून जी काही वक्तव्यं केली जात आहेत ती अपेक्षित नाहीत. तरीही मी आज म्हटलं उद्धव ठाकरेंना हे सांगितलं की सर चर्चा सुरु आहेत. त्यावर मला उद्धव ठाकरे असं म्हणाले की आपल्याकडून काहीच प्रश्न नाही. आता निर्णय त्यांना (राज ठाकरे) घ्यायचा आहे. NOW BALL IN IS THERE COURT. आता त्यांच्या कोर्टात चेंडू आहे आणि आम्ही आमची भूमिका स्पष्ट केली आहे. आता यासंदर्भातला निर्णय मनसे अध्यक्षांनी घ्यायचा आहे.१९ एप्रिलच्या मुलाखतीत महेश मांजरेकर यांनी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे अजूनही एकत्र येऊ शकतात का? असा थेट सवाल महेश मांजरेकर यांनी राज ठाकरे यांना विचारला. त्यावर राज ठाकरे म्हणाले, “कोणत्याही मोठ्या गोष्टींसमोर आमच्यातील वाद, भांडणं किरकोळ आहेत. महाराष्ट्र खूप मोठा आहे. मराठी माणसाच्या अस्तित्त्वासाठी या गोष्टी अत्यंत शुल्लक आहेत.

### महाराष्ट्राचं हित ही एकच माझी अट

एकत्र येणं, एकत्र राहणं यात फार कठीण गोष्ट वाटत नाही. विषय फक्त इच्छेचा आहे, कारण हा माझ्या एकट्याचा विषय नाही. माझं म्हणणं आहे की सर्व राजकीय पक्षातील सर्व मराठी माणसांनी एकत्र येऊन एकच पक्ष काढावा.” असं राज ठाकरे म्हणाले होते.राज ठाकरेंनी साद दिल्यानंतर उद्धव ठाकरेंनीही त्यावर प्रतिक्रिया दिली. “आमच्यात भांडण नव्हतंच, पण तरीही आमच्यातील भांडणं मिटवून टाकल्याचं मी जाहीर करतो. त्यावेळेला सर्व मराठी माणसांनी ठरवायचं की भाजपाबरोबर जायचं की माझ्याबरोबर यायचं. मग काय द्यायचाय त्या तो पाठिंबा बिनशर्त द्या. महाराष्ट्राचं हित ही एकच माझी अट आहे”, असं उद्धव ठाकरे म्हणाले होते. त्यानंतर विविध वक्तव्य समोर आली. आता सुषमा अंधारे यांनी राज ठाकरेंसह युतीबाबत उद्धव ठाकरे काय म्हणाले ते सांगितलं आहे.

---

# ते समोर आल्यावर हात जोडतात

## प्यारे खान यांच्या टिकेला मंत्री नीतेश राणेंचे प्रतिउत्तर




।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जबाबदार पदावर बसलेल्या व्यक्तीने जबाबदारीने भूमिका बजावली पाहिजे,असे मी मानतो.राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष म्हणून तुम्ही मुस्लिम आणि अल्पसंख्याक समाजाला एकत्रित कसे करू शकता, त्यांचे प्रबोधन कसा करू शकता, यावर भूमिका मांडली पाहिजे, असे मंत्री नितेश राणे यांनी म्हटले आहे. ते आज नागपूर येथे पत्रकारांशी बोलत होते.**

दोन समाजात तेढ निर्माण झाली तर अशांतता निर्माण होऊ शकते. आम्ही असताना दंगली होण्याचे काही कारण नाही. महाराष्ट्र शांत ठेवायचा असेल तर इको फ्रेंडली बकरी ईद हा पर्याय आहे. प्यारे खान टीव्हीवर माझ्यावर बोलतात, मात्र जेव्हा समोरासमोर येतात तेव्हा हात जोडून उभे राहतात, असेही राणे म्हणाले.प्यारे खान यांची जी भूमिका आहे, ती इस्लामला बदनाम करणारी आहे. जेव्हा इको फ्रेंडली होळी, इको फ्रेंडली दिवाळी, फटाके मुक्त दिवाळी असे असंख्य सल्ले हिंदू समाजाला दिले जातात. तेव्हा हिंदू समाज समजून घेतो. आम्ही दुसऱ्या धर्माला नावे ठेवत बसत नाही. हिंदू समाज आपला धाक दाखवत नाही.

तसाच विचार मुस्लिमांनी करावा अशी माझी भूमिका व सल्ला आहे. जसे हिंदू समाज पर्यावरणवाद्यांचे ऐकतो आणि फटाके वाजवत नाही, रंग खेळत नाही, त्याप्रमाणे मुस्लिमांनी इको फ्रेंडली बकरी ईद करावी हा माझा चांगला सल्ला आहे, यामध्ये हिंदू मुस्लिम वाद निर्माण करण्याचा प्रश्न कुठे आहे, असेही ते म्हणाले.बकरी ईद मुळे हिंदू नागरिक अस्वस्थ आहे, कारण त्यांच्या सोसायटीमध्ये बकरे कापले जाणार, त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण होणार आणि दोन्ही समाजामध्ये वाद निर्माण होणार आहेत. उद्या यामुळे दंगली पण होऊ शकतात. हे थांबवण्यासाठी जर कोणी सल्ले देत असेल तर ऐकले पाहिजे. हिंदू समाजाला सल्ले दिले जाते, तेव्हा हिंदू समाज आक्रोश दाखवतो का? बळजबरी करतो का?

### वाद निर्माण करण्याचा प्रश्न कुठे आहे

मग अबू आझमी कसे बोलतो, हम तो बकरा काटेंगे. यावरूनच हिंदू समाजाचा समजूतदारपणा दिसून येतो. त्यामुळे कोण इस्लामला बदनाम करत आहे आणि कोण फडणवीस यांची बदनामी करत आहे हे महाराष्ट्राला कळते आहे.प्यारे खान यांना मी सल्ला देतो त्यांनी मी काय बोललो याबद्दल विचार करावा आणि त्यांनीच मुस्लिम समाजाला आव्हान करायला पाहिजे की नितेश राणे जे बोलत आहे ते आपल्या हिताचे आहे. त्याप्रमाणे आपण इको फ्रेंडली बकरी ईद साजरी करू, असेही ते म्हणाले. तसाच विचार मुस्लिमांनी करावा अशी माझी भूमिका व सल्ला आहे. जसे हिंदू समाज पर्यावरणवाद्यांचे ऐकतो आणि फटाके वाजवत नाही, रंग खेळत नाही, त्याप्रमाणे मुस्लिमांनी इको फ्रेंडली बकरी ईद करावी हा माझा चांगला सल्ला आहे, यामध्ये हिंदू मुस्लिम वाद निर्माण करण्याचा प्रश्न कुठे आहे.

# जवानांची बदनामी करण्याचं स्वातंत्र्य नाही

## उच्च न्यायालयाने राहुल गांधींना फटकारलं




।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**भारतीय लष्कराबाबतच्या कथित आक्षेपार्ह टिप्पणीवरून राहुल गांधींना मानहानी प्रकरणात दिलासा देण्यास अलाहाबाद उच्च न्यायालयाने स्पष्ट शब्दांत नकार दिला आहे. न्यायालयाने म्हटलं आहे की प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. मात्र, त्याअंतर्गत भारतीय लष्कराला बदनाम करण्याचा अधिकार नाही. यासह न्यायमूर्ती सुभाष विद्यार्थी यांच्या एकल पीठाने राहुल गांधी यांची याचिका फेटाळली आहे. मानहानीच्या खटल्यात लखनौ एमपी-एमएलए कोर्टाने राहुल गांधींविरोधात समन्स जारी केलं होतं. त्याविरोधात राहुल गांधी यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयाकडे दाद मागितली होती. त्यावर आज सुनावणी पार पडली.**

न्यायमूर्ती सुभाष विद्यार्थी यांनी स्पष्ट केलं की "भारतीय संविधानाच्या कलम १९ (१) (अ) अंतर्गत काही वाजवी निर्बंधांसह अभिव्यक्ती स्वातंत्र्याची हमी देण्यात आली आहे. मात्र, निःसंशयपणे याअंतर्गत कोणालाही भारतीय लष्कराची बदनामी करण्याचं स्वातंत्र्य दिलं जात नाही". बॉर्डर रोड्स ऑर्गनायझेशनचे (बीआरओ) माजी संचालक उदय शंकर श्रीवास्तव यांनी राहुल गांधींविरोधात लखनौ न्यायालयात मानहानीचा खटला दाखल केला आहे जो प्रलंबित आहे. यामध्ये म्हटलं आहे की राहुल गांधींनी १६ डिसेंबर २०२२ रोजी भारत जोडो यात्रेदरम्यान भारतीय लष्कराविरोधात आक्षेपार्ह टिप्पणी केली होती.९ डिसेंबर २०२२ रोजी भारतीय लष्कर व चिनी सैन्यात झालेल्या संघर्षाबाबत राहुल गांधी यांनी अपमानजनक वक्तव्य केल्याचं श्रीवास्तव यांनी त्यांच्या तक्रारीत म्हटलं आहे. राहुल यांनी भारतीय लष्कराला बदनाम करण्याचा प्रयत्न केल्याचं श्रीवास्तव यांनी म्हटलं आहे. श्रीवास्तव म्हणाले, "राहुल गांधी वारंवार भारतीय लष्कराचा अपमान करत आहेत. अरुणाचल प्रदेशमध्ये चीनचे सैनिक आपल्या जवानांना धोपटत आहेत. मात्र, भारतीय प्रसारमाध्यमं त्यावरून प्रश्न विचारत नाहीत, असं राहुल गांधींनी म्हटलं होतं".लखनौ न्यायालयाने म्हटलं होतं की प्राथमिकदृष्ट्या असं दिसतंय की राहुल गांधी यांचं वक्तव्य भारतीय जवानांचं खच्चीकरण करणारं आहे. त्यांच्या वक्तव्याने आपले जवान, लष्कराशी संबंधित लोक व जवानांच्या कुटुंबीयांचं खच्चीकरण झालं आहे. त्यानंतर राहुल गांधी यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती.न्यायमूर्ती सुभाष विद्यार्थी यांनी स्पष्ट केलं की "भारतीय संविधानाच्या कलम १९ (१) (अ) अंतर्गत काही वाजवी निर्बंधांसह अभिव्यक्ती स्वातंत्र्याची हमी देण्यात आली आहे. मात्र, निःसंशयपणे याअंतर्गत कोणालाही भारतीय लष्कराची बदनामी करण्याचं स्वातंत्र्य दिलं जात नाही". बॉर्डर रोड्स ऑर्गनायझेशनचे (बीआरओ) माजी संचालक उदय शंकर श्रीवास्तव यांनी राहुल गांधींविरोधात लखनौ न्यायालयात मानहानीचा खटला दाखल केला आहे जो प्रलंबित आहे. यामध्ये म्हटलं आहे की राहुल गांधींनी १६ डिसेंबर २०२२ रोजी भारत जोडो यात्रेदरम्यान भारतीय लष्कराविरोधात आक्षेपार्ह टिप्पणी केली होती.९ डिसेंबर २०२२ रोजी भारतीय लष्कर व चिनी सैन्यात झालेल्या संघर्षाबाबत राहुल गांधी यांनी अपमानजनक वक्तव्य केल्याचं श्रीवास्तव यांनी त्यांच्या तक्रारीत म्हटलं आहे.

### नेमकं प्रकरण काय?

राहुल यांनी भारतीय लष्कराला बदनाम करण्याचा प्रयत्न केल्याचं श्रीवास्तव यांनी म्हटलं आहे. श्रीवास्तव म्हणाले, "राहुल गांधी वारंवार भारतीय लष्कराचा अपमान करत आहेत. अरुणाचल प्रदेशमध्ये चीनचे सैनिक आपल्या जवानांना धोपटत आहेत. मात्र, भारतीय प्रसारमाध्यमं त्यावरून प्रश्न विचारत नाहीत, असं राहुल गांधींनी म्हटलं होतं".लखनौ न्यायालयाने म्हटलं होतं की प्राथमिकदृष्ट्या असं दिसतंय की राहुल गांधी यांचं वक्तव्य भारतीय जवानांचं खच्चीकरण करणारं आहे. त्यांच्या वक्तव्याने आपले जवान, लष्कराशी संबंधित लोक व जवानांच्या कुटुंबीयांचं खच्चीकरण झालं आहे. त्यानंतर राहुल गांधी यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

# शाळांच्या फी वाढीला बसणार चाप?

## दिल्ली सरकारने फी वाढीच्यापार्श्वभूमीवर निर्णय घेतला





।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्या सरकारने खासगी शाळांच्या फी वाढीच्या मनमानीच्या पार्श्वभूमीवर एक महत्वाचा निर्णय घेतला आहे. काही दिवसांपूर्वी दिल्ली सरकारने खासगी शाळांच्या संदर्भातील शुल्क नियमन विधेयकाच्या मसुद्याला मंजुरी दिली होती. त्यानंतर आता शालेय शिक्षण (शुल्क निर्धारण आणि नियमनात पारदर्शकता) विधेयक लागू करण्यासाठी सरकार अध्यादेश आणणार असल्याची माहिती दिल्लीचे शिक्षण मंत्री आशिष सूद यांनी दिली आहे....**

दरम्यान, याआधी हे विधेयक १४, १५ मे रोजी दिल्ली विधानसभेत मांडण्यात येणार होतं. या संदर्भातील माहिती देताना मंत्री आशिष सूद यांनी म्हटलं की,"आम्ही दिल्ली शालेय शिक्षण पारदर्शकता विधेयक मांडणार आहोत. मात्र, हे विधेयक मागच्या विधानसभेच्या अधिवेशनात मांडता आलं नव्हतं. पण आता या विधेयकामुळे खासगी शाळांकडून होणारं शोषण थांबवण्यासाठी आम्ही या विधेयकाचं कायद्यात रूपांतर करण्यासाठी अध्यादेश आणत आहोत. गेल्या २७ वर्षांपासून शाळा माफियांना पाठिंबा देणाऱ्यांना यामुळे खूप वाईट वाटलं असेल", असं आशिष सूद यांनी म्हटलं. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.आशिष सूद यांनी म्हटलं की, "शाळेची फी दरवर्षी वाढत असल्याचं पहायला मिळतं. पण आमच्या १०० दिवसांत एकाही शाळेने फी वाढवली नाही. तसेच आमच्या मंत्र्यांनी विविध वृत्तपत्रांचे व्हिडीओ रिपोर्ट्स देखील दाखवले. फी वाढीचा मुद्दा हा नवीन नाही. हे निदर्शने २०२१ पासून होत आहेत. असं असतानाही याआधीच्या आम आदमी पक्षाच्या सरकारने याबाबत कोणताही निर्णय घेतला नव्हता", असंही सूद यांनी म्हटलं.यावेळी आशिष सूद यांनी माजी शिक्षण मंत्री मनीष सिसोदिया यांच्यावरही टीका केली. त्यांनी शालेय शिक्षणात पारदर्शकताकाहीही केलं नाही. कोविडचा काळ होता, तरी अरविंद केजरीवाल हे शीशमहाल बांधण्यात व्यस्त होते.

### फी वाढीला बसणार चाप?

मी आता त्यांना विचारू इच्छितो की त्यांनी हा निर्णय का घेतला नाही? आम्हीच शाळांमध्ये समिती पाठवली. आमच्या अहवालामुळेच उच्च न्यायालयाने कडक आदेश दिले", असंही आशिष सूद म्हणाले आहेत.तसेच दिल्ली सरकारने गेल्या १०० दिवसांत घेतलेल्या अनेक शिक्षण-संबंधित निर्णयांची यादी देखील वाचून दाखवली. आमचं सरकार शालेय आणि उच्च शिक्षणावर लक्ष केंद्रित करत आहे. एआय ते स्मार्ट क्लासरूमपर्यंत आमचा प्रयत्न असणार आहे. जेणेकरून एकही विद्यार्थी मागे राहणार नाही. तसेच दिल्ली विद्यापीठातील १२ महाविद्यालये आणि सर्व राज्य विद्यापीठांना अनुदान म्हणून २७४.३४ कोटी रुपये जारी करण्याचा निर्णय हे एक महत्वाचं पाऊल आहे.

# हिना खानचं गाजावाजा न करता लग्न!

ये रिश्ता क्या कहलाता है' या मालिकेतून अभिनेत्री हिना खान घराघरांत लोकप्रिय झाली. वैयक्तिक आयुष्यात गेल्या काही महिन्यांपासून हिना कॅन्सरशी झुंज देत आहे. तिला तिसऱ्या टप्प्यातील स्तनाच्या कर्करोगाचं ( ब्रेस्ट कॅन्सर ) निदान झालं होतं. या कठीण काळात अभिनेत्रीला कुटुंबीयांसह तिच्या बॉयफ्रेंडने खंबीरपणे साथ दिली.हिना खान व रॉकी जैस्वाल जवळपास ११ वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये आहेत. हे दोघं लग्न केव्हा करणार याची हिनाचे चाहते आतुरतेने वाट पाहत होते. अखेर रॉकीशी गुपचूप लग्न करुन हिनाने तिच्या चाहत्यांना सुखद धक्का दिला आहे. या दोघांचा लग्नसोहळा नोंदणी पद्धतीने पार पडला. याचे फोटो अभिनेत्रीने इन्स्टाग्रामवर शेअर केले आहेत.आम्हा दोघांचं जग खूपच वेगवेगळं आहे यातून आम्ही प्रेमाचं नवीन विश्व निर्माण केलं. आमच्यातील मतभेद कमी झाले, आमची मनं जुळली आणि आता आम्ही दोघंही आयुष्यभरासाठी बंधनात अडकलो आहोत. आम्हीच एकमेकांचं घर आहोत, आम्हीच आमच्या आयुष्यातील सकारात्मक ऊर्जा आहोत आणि आम्हीच आमची आशा आहोत. आम्ही एकत्र मिळून सगळे अडथळे पार केले आहेत. आज आमचं प्रेम जिंकलं. आता पती आणि पत्नी म्हणून हा नवा प्रवास सुरू करताना तुम्ही आम्हाला तुमचे शुभाशीर्वाद आणि शुभेच्छा द्या...” अशी पोस्ट शेअर करत हिनाने भावना व्यक्त केल्या आहेत.दरम्यान, हिना-रॉकी यांच्या प्रेमकहाणीबद्दल सांगायचं झालं तर, हिनाने 'ये रिश्ता क्या कहलाता है' या मालिकेतून छोट्या पडद्यावर पदार्पण केलं.

# तुमच्या वडिलांना व्हेंटिलेटर लावलं आहे

अभिनेता प्रसाद लिमये नुकताच 'झी मराठी' वाहिनीवरील 'नवरी मिळे हिटलरला' या मालिकेत झळकला होता. त्यामध्ये त्याने किशोर जहागीरदार ही भूमिका साकारली होती. त्यामधून तो खलनायक म्हणून प्रेक्षकांसमोर आला. त्याच्या या भूमिकेनं प्रेक्षकांचं लक्ष वेधलं. मालिकेत त्यानं लीला-एजे यांच्या प्रेमकहाणीमध्ये अनेकदा अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. काही दिवसांपूर्वीच या मालिकेनं प्रेक्षकांचा निरोप घेतला. प्रसाद लिमयेनं नुकतीच 'मराठी मनोरंजन विश्व'ला मुलाखत दिली. यावेळी त्यानं त्याचा संघर्षकाळ, वडिलांचा पाठिंबा, अभिनय क्षेत्र असा सगळ प्रवास कथन केला आहे. प्रसादला संघर्षकाळात त्याच्या वडिलांनी खूप पाठिंबा दिल्याचं त्यानं यामधून सांगितलं आहे. परंतु, त्याच्या बाबांचं अकाली निधन झालं आणि त्यानंतर तो बरेच दिवस घरीच असल्याचंही म्हटलं आहे. 'मराठी मनोरंजन विश्व'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये, प्रसाद वडिलांच्या निधनाबद्दल बोलताना म्हणाला, “'देवयानी' मालिकेचा शेवटचा दिवस होता. तेव्हा मी आणि बाबांनी ठरवलं होतं की, रत्नागिरीत आमचं कुलदैवत आहे तिकडे जायचं. तेव्हा बाबा म्हणाले की, तू पुण्याला आलास की, आपण रत्नागिरीला जाऊ.”मी म्हटलं, बाबा तुम्ही पुढे व्हा. मी शूट संपलं की, दोन दिवस आराम करतो. कारण- मी सलग काम करतोय. आणि मग सरळ रत्नागिरीलाच येतो. ते म्हणाले ठीक आहे. त्यांच्याकडे पास असल्याने ते ट्रेनने जाणार होते; पण काय झालं कुणास ठाऊक ते त्या दिवशी एसटीनं गेले आणि मला सकाळी ताईचा फोन आला.

# प्रीती झिंटाने घेतला मोठा निर्णय

अभिनेत्री प्रीती झिंटा सध्या आयपीएलमुळे मोठ्या प्रमाणात चर्चेत आहे. काल मंगळवारी (३ जून) आयपीएल २०२५ ची सांगता झाली. या पर्वाच्या अंतिम सामन्यामध्ये प्रीती झिंटाचा संघ पंजाब किंग्ज व रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू प्रतिस्पर्धी होते. परंतु, आरसीबीनं पंजाब किंग्जवर सहा धावांनी मात केली. त्यामुळे प्रीती झिंटाचा संघ कमी धावांच्या फरकामुळे आयपीएलच्या ट्रॉफीला मुकला. या संपूर्ण मोसमात प्रीती झिंटा अनेकदा चर्चेचा विषय ठरली. प्रीती झिंटा फक्त अभिनयापुरती मर्यादित न राहता, ती पंजाब किंग्ज या संघाची मालकीण आहे. एवढंच नव्हे, तर याव्यतिरिक्तसुद्धा ती आणखी एक महत्त्वाची जबाबदारी पार पाडत आहे. प्रीती झिंटानं सांगितलं होतं की, तिनं ३४ मुलींना दत्तक घेतले आहे. 'पिंकव्हिला'च्या वृत्तानुसार ती या मुलींच्या शिक्षण, जेवण व कपडे यांचा सर्व खर्च करणार असल्याचं अभिनेत्रीनं सांगितलं होतं. पुढे अभिनेत्री म्हणाली, “त्या आता माझ्या मुली आहेत. माझी जबाबदारी आहेत. मी सातत्यानं त्यांच्या संपर्कात असेन आणि वर्षातून दोनदा त्यांची भेट घेईनप्रीती झिंटाच्या खासगी आयुष्याबद्दल बोलायचं झालं, तर तिनं जीन गुडइनफसह २०१६ साली लॉस एंजेलिसमध्ये लग्न केलं होतं. तिचे पती जीन गुडइनफ आर्थिक विश्लेषक आहेत. प्रीती झिंटा व जीन गुडइनफ या दोघांना दोन मुलं आहेत. एक मुलगी आणि एक मुलगा. २०२१ साली सरोगसीमार्फत दोन मुलांना जन्म दिला.



# 'अफलातून' ते 'एक डाव भुताचा'!

दिग्गज मराठी अभिनेते अशोक सराफ यांना भारत सरकारकडून नुकताच पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. अशोक सराफ यांचं नाव घेताच डोळ्यांसमोर उभा राहतो एक हसमुख चेहरा, धमाल विनोदी-हरहुन्नरी अभिनेते आणि आता त्यांच्या नावापुढे लागलीय एक खास ओळख 'पद्मश्री अशोक सराफ'. फक्त स्टार होणं सोपं असतं पण, आपल्या चाहत्यांच्या मनात घर करणं हे फक्त अशोक सराफ यांच्यासारख्या महान कलाकारांनाच जमतं. त्यांच्या कलेला अभिवादन करण्यासाठी खास 'अशोक मामा चित्रपट महोत्सव' साजरा करण्यात येत आहे. अल्ट्रा झकास ओटीटीवर 'अशोक मामा चित्रपट महोत्सव' साजरा केला जाईल. अशोक सराफ यांचा जगभरात गाजलेला 'अशी ही बनवाबनवी' चित्रपट तर सगळ्यांना माहितीच आहे, पण यावेळी प्रेक्षकांना अशोक सराफ यांचे अन्य काही निवडक सिनेमे देखील पाहायला मिळणार आहेत.अशोक सराफ यांनी 'अफलातून' (1991) मध्ये गावातून शहरात आलेल्या बजरंगरावांची विनोदी भूमिका साकारली होती. तर त्यांचा 'एक डाव भुताचा' (1982) सिनेमा देखील सर्वत्र लोकप्रिय ठरला होता. 'आपली माणसं', 'वजीर', 'इना मिना डिका', 'सून माझी लाडकी', 'ऐकावं ते नवलच', 'देवघर', 'पैंजण', 'मोस्ट वाँटेड', 'कोणासाठी कुणीतरी', 'डीड शहाणे', 'या टोपीखाली दडलंय काय?', 'आंधळी कोशिंबीर' असे एकापेक्षा एक गाजलेले सिनेमे अशोक सराफ यांच्या अभिनय क्षेत्रातील कारकिर्दीत महत्त्वाचे ठरले

# बोल्ड सीन करण्याबद्दल श्रियाची प्रतिक्रिया

मराठीसह हिंदी सिनेसृष्टीतही लोकप्रिय असलेली जोडी म्हणजे सचिन पिळगावकर आणि सुप्रिया पिळगावकर. या जोडीने आजवर अनेक हिट चित्रपट देत प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. आई-वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत त्यांची लाडकी लेक श्रिया पिळगांवकरदेखील अभिनय क्षेत्रात आली. 'मिर्झापूर', 'गिल्टी माईंड्स', 'द ब्रोकन न्यूज', 'ड्राय डे', 'ताजा खबर'सारख्या सीरिजमधून श्रियाने ओटीटी विश्व गाजवलं आहे. अशातच आता लवकरच ती 'छलकपट' सीरिजमधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. ओटीटीमध्ये श्रियाने अनेकविध भूमिका साकारल्या आहेत. 'छलकपट' सीरिजनिमित्ताने श्रियाने नुकताच लोकमत फिल्मीशी संवाद साधला. यावेळी तिला सीरिजमधील बोल्ड सीन करताना कोणता विचार करावा लागतो का? याबद्दल आई-वडिलांशी चर्चा होते का? असं विचारण्यात आलं.याचं उत्तर देताना श्रिया म्हणाली, “मला वाटतं ऑफस्क्रीन संस्कार हे ऑनस्क्रीन संस्कारांपेक्षा जास्त महत्त्वाचे आहेत. मला माझ्या ऑफस्क्रीन संस्कारांवर विश्वास आहे. पण एक कलाकार म्हणून मी स्वत:वर मर्यादा घालू शकते असं मला वाटतं नाही किंवा तसं करूही नये. आता काळानुसार एखादी गोष्ट सांगण्याची पद्धत खूप बदलली आहे. आताच्या कामातली मर्यादा आणि सहजता पुर्वीपेक्षा बदलली आहे.”यापुढे श्रिया म्हणते, “एखाद्या प्रेमकथेमध्ये मुलगा-मुलगी हे किस करताना दाखवलं जातं. तसे सीन करण्यासाठी मी नाही म्हणणार नाही. पण ते पडद्यावर कसं दाखवलं जाणार आहे? त्या सीनला कसं साकारलं जाणार आहे? त्यामागे नक्की काय भावना आहे? हे महत्त्वाचं आहे. मला स्वत:ला कळतं की, त्यामागचा नेमका अर्थ काय आहे.”यापुढे श्रिया म्हणाली, “एखाद्या सीरिजमधील बोल्ड सीनमुळे त्याचं थेट मूल्यमापन करू नये. कारण ती त्या-त्या कथेची गरजही होती. त्यामुळे मला वाटतं की, अशा सीनमागची तुमचा हेतु महत्त्वाचा आहे. यासाठी आई-वडील मला नेहमीच पाठींबा देतात. पण त्यांना माहीत आहे की, मलाही ते निर्णय घेण्याचं स्वतंत्र आहे. पण इंटरनेटवर काहीही होऊ शकतं. फेक व्हिडीओ वगैरे... काहीही होऊ शकतं.”मराठीसह हिंदी सिनेसृष्टीतही लोकप्रिय असलेली जोडी म्हणजे सचिन पिळगावकर आणि सुप्रिया पिळगावकर. या जोडीने आजवर अनेक हिट चित्रपट देत प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. आई-वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत त्यांची लाडकी लेक श्रिया पिळगांवकरदेखील अभिनय क्षेत्रात आली. 'मिर्झापूर', 'गिल्टी माईंड्स', 'द ब्रोकन न्यूज', 'ड्राय डे', 'ताजा खबर'सारख्या सीरिजमधून श्रियाने ओटीटी विश्व गाजवलं आहे.



# चिन्नास्वामी चेंगराचेंगरीत 11 जणांचा मृत्यू

## मृतांच्या नातेवाईकांना 10 लाखांची मदत जाहीर : सिद्धरामय्या

। नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आरसीबीने १८ वर्षांनी आयपीएलचा अंतिम सामना जिंकला. आज त्यांची विजयी परेड निघाली. या विजयी परेडमध्ये चेंगराचेंगरी झाल्याची मोठी बातमी समोर आली आहे. या चेंगराचेंगरीत जवळपास १५ जण जखमी झाले आहेत. बंगळुरुतल्या चिन्नास्वामी स्टेडियमजवळ झालेल्या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाला आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी ही माहिती दिली आहे. दरम्यान या घटनेतील जखमींवर उपचार सुरु आहेत.जखमींना बोरिंग हॉस्पिटल आणि वैदेही हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले आहे.**





“चिन्नास्वामी स्टेडियम या ठिकाणी घडलेली घटना दुर्दैवी आहे. इतक्या मोठ्या संख्येने लोक येतील याची पुसटशीही कल्पना आम्हाला नव्हती. साधारण तीन लाख लोक विधान सौधा भागात जमा झाले होते. मैदानाची क्षमता ३५ हजार इतकीच आहे. आम्हाला वाटलं होतं की साधारण या संख्येहून काही जास्त लोक येतील. ज्या ११ जणांचा या घटनेत मृत्यू झाला आहे त्यापैकी बरेच तरुण-तरुणी आहेत.” असं कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी म्हटलं आहे.चिन्नास्वामी स्टेडियम येथील चेंगराचेंगरीत ज्यांचा मृत्यू झाला त्यांच्या कुटुंबीयांना आम्ही १० लाखांची मदत जाहीर करत आहोत. अशीही घोषणा मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी केली आहे. तसंच घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी आणि अनपेक्षित होती असंही त्यांनी म्हटलं आहे. तसंच या घटनेची चौकशी समिती नेमून केली जाईल असंही त्यांनी स्पष्ट केलं आहे.“चेंगराचेंगरीच्या घटनेसंदर्भात पोलीस आयुक्तांशी मी बोललो आहे. तसेच आता मी रुग्णालयात जाऊन जखमींशी संवाद साधणार आहे. या घटनेत किती जणांचा मृत्यू झाला हे आत्ता सांगता येणार नाही. आम्ही नागरिकांना शांत राहण्याचे आवाहन करत आहोत. आम्ही आरसीबीच्या विजयी परेडचा कार्यक्रम देखील १० मिनिटांत आटोपला आहे. तसेच सर्व परिस्थिती पूर्व पदावर आणण्यासाठी प्रयत्न करत आहोत”, असं उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांनी म्हटलं होतं. त्यानंतर आता मुख्यमंत्री सिद्धरामय्यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. त्यांनी या घटनेत ११ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती दिली आहे.आम्ही मैदानावर विराट कोहली आणि विजयी टीमला पाहण्यासाठी आलो आहोत. मात्र मैदानातील सगळ्या जागा भरल्या आहेत. त्यामुळे आम्हाला आतमध्ये जाऊ दिलं जात नाहीये. तसंच मागेही जाऊ दिलं जात नाहीये कारण बरीच गर्दी या ठिकाणी झाली आहे. अनेक लोक जखमी झाले आहेत असं एका मुलीने ANI ला सांगितलं.“चिन्नास्वामी स्टेडियम या ठिकाणी घडलेली घटना दुर्दैवी आहे. इतक्या मोठ्या संख्येने लोक येतील याची पुसटशीही कल्पना आम्हाला नव्हती. साधारण तीन लाख लोक विधान सौधा भागात जमा झाले होते. मैदानाची क्षमता ३५ हजार इतकीच आहे. आम्हाला वाटलं होतं की साधारण या संख्येहून काही जास्त लोक येतील. ज्या ११ जणांचा या घटनेत मृत्यू झाला आहे त्यापैकी बरेच तरुण-तरुणी आहेत.” असं कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी म्हटलं आहे.चिन्नास्वामी स्टेडियम येथील चेंगराचेंगरीत ज्यांचा मृत्यू झाला त्यांच्या कुटुंबीयांना आम्ही १० लाखांची मदत जाहीर करत आहोत. अशीही घोषणा मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी केली आहे. तसंच घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी आणि अनपेक्षित होती असंही त्यांनी म्हटलं आहे. तसंच या घटनेची चौकशी समिती नेमून केली जाईल असंही त्यांनी स्पष्ट केलं आहे

### डीके शिवकुमार काय म्हणाले?

चेंगराचेंगरीच्या घटनेसंदर्भात पोलीस आयुक्तांशी मी बोललो आहे. तसेच आता मी रुग्णालयात जाऊन जखमींशी संवाद साधणार आहे. या घटनेत किती जणांचा मृत्यू झाला हे आत्ता सांगता येणार नाही. आम्ही नागरिकांना शांत राहण्याचे आवाहन करत आहोत. आम्ही आरसीबीच्या विजयी परेडचा कार्यक्रम देखील १० मिनिटांत आटोपला आहे. तसेच सर्व परिस्थिती पूर्व पदावर आणण्यासाठी प्रयत्न करत आहोत”, असं उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांनी म्हटलं होतं. त्यानंतर आता मुख्यमंत्री सिद्धरामय्यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. त्यांनी या घटनेत ११ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती दिली आहे. आम्ही मैदानावर विराट कोहली आणि विजयी टीमला पाहण्यासाठी आलो आहोत. मात्र मैदानातील सगळ्या जागा भरल्या आहेत. त्यामुळे आम्हाला आतमध्ये जाऊ दिलं जात नाहीये. तसंच मागेही जाऊ दिलं जात नाहीये कारण बरीच गर्दी या ठिकाणी झाली आहे. अनेक लोक जखमी झाले आहेत असं एका मुलीने ANI ला सांगितलं.

# कुलदीपने गुपचूप उरकला साखरपुडा

## कुलदीप यादव बालपणीच्या मैत्रिणीबरोबर लग्नगाठ बांधणार

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आयपीएल २०२५ नंतर कुलदीप यादवच्या साखरपुड्याचा फोटो अचानक समोर आला आहे. कुलदीप यादवने बालपणीची मैत्रिण वंशिका हिच्यासोबत साखरपुडा उरकला आहे. इंग्लंड दौऱ्यापूर्वी कुलदीपने साखरपुडा उरकल्याचा फोटो समोर आला आहे.**

भारतीय क्रिकेटचा ‘चायनामन’ म्हणून ओळखला जाणारा भारतीय फिरकी गोलंदाज कुलदीप यादव बुधवारी लखनौमध्ये झालेल्या एका खाजगी समारंभात त्याची बालपणीची मैत्रीण वंशिकाशी साखरपुडा केला. या खाजगी कार्यक्रमाला जवळचे कुटुंबीय आणि रिंकू सिंगसह उत्तर प्रदेशातील अनेक क्रिकेटपटू उपस्थित होते.लखनौमध्ये हा साखरपुडा समारंभ पार पडला, जिथे कुलदीपने वंशिकाला अंगठी घालत त्यांचं नातं ऑफिशियल केलं. वंशिका जी मूळची श्याम नगरची आहे आणि एलआयसीमध्ये काम करते. दोघेही लहानपणापासून एकमेकांना ओळखतात.इंग्लंड दौऱ्याआधी कुलदीप यादवने साखरपुडा उरकत चाहत्यांना आनंदाची बातमी दिली आहे. दरम्यान इंग्लंड दौऱ्यासाठी कुलदीप यादवची देखील निवड करण्यात आली आहे. कुलदीप यादव हा टीम इंडियाचा महत्त्वाचा



वेगवान गोलंदाज असणार आहे. याचबरोबर नवख्या संघामध्ये कुलदीप यादव हा अनुभवी खेळाडूही असेल.भारतीय क्रिकेट संघाचा सध्याच्या घडीला उत्कृष्ट फिरकी गोलंदाजांपैकी एक असलेला कुलदीप यादव आता लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे. कुलदीपने आज म्हणजेच ४ जून रोजी आपल्या बालपणीच्या मैत्रिणीबरोबर साखरपुडा केला आहे. लखनौमध्ये एका खाजगी समारंभात साखरपुडा उरकला. कुलदीप यादवची होणारी पत्नी नेमकी कोण आहे, जाणून घ्या. आयपीएलमध्ये दिल्ली कॅपिटल्सकडून खेळणाऱ्या स्टार स्पिनरने गुपचूप साखरपुडा केला. साखरपुडा समारंभ खाजगी ठेवण्यात आला. भारतीय संघाचा चायनामन गोलंदाज कुलदीप यादव आणि वंशिका यांचा साखरपुडा समारंभ लखनौमध्ये आयोजित एका समारंभात पार पडला.वंशिका ही मूळची कानपूरमधील श्याम नगरची आहे आणि ती एलआयसीमध्ये नोकरी करते. वंशिका आणि कुलदीप यादव हे बालपणीचे मित्र आहेत. हळूहळू त्यांच्या मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले आणि आता दोघांचा साखरपुडा पार पडला आहे. रिंकू सिंगसह अनेक क्रिकेटपटू कुलदीपच्या साखरपुड्याला उपस्थित राहिले आहेत.कुलदीप यादवच्या होणाऱ्या पत्नीचं नाव वंशिका आहेकुलदीप यादवची पत्नी एलआयसीमध्ये काम करते. ती कुलदीपची बालपणीची मैत्रिण आहे.

### कोण आहे कुलदीपची होणारी पत्नी?

कुलदीपच्या साखरपुड्याचे फोटो त्याने अद्याप शेअर केलेले नाही. इंग्लंड दौऱ्यापूर्वी कुलदीप यादवचा साखरपुडा झाला. इंग्लंडच्या भूमीवर होणाऱ्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी तो टीम इंडियाचा भाग आहे. कुलदीप सध्या आयपीएल २०२५ मध्ये खेळत होता आणि दिल्ली कॅपिटल्सचा भाग होता.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

। मंगळवार ।
। दि. 18 मार्च 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## राष्ट्रवादीतर्फे गाथा सन्मानाची-कर्तृत्ववान महिलांचा गुणगौरव!

### जागतिक महिला दिनानिमित्त शहराध्यक्ष प्रा. कविता आल्हाट यांचा पुढाकार

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जागतिक महिला दिनाचे औचित्य साधुन राष्ट्रवादी महिला काँग्रेस पिंपरी चिंचवड शहर अध्यक्षा प्रा कविता आल्हाट यांच्या वतीने "गाथा सन्मानाची" या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये आपले अमूल्य योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा यावेळी गौरव करण्यात आला.**



सदर सन्मान सोहळा गोदावरी आंगण, बोऱ्हाडे वाडी, मोशी येथे पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष प्रा. कविता आल्हाट यांनी केले. या कार्यक्रमात महिला सक्षमीकरणाला चालना देणाऱ्या आणि समाजहितासाठी कार्य करणाऱ्या महिलांचा विशेष सन्मान करण्यात आला. विविध क्षेत्रांमध्ये आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या, विशेषतः परिचारिका, शिक्षिका, ब्युटीशियन, पोलीस कॉन्स्टेबल, तसेच इतर विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या महिलांना शहर अध्यक्ष कविता आल्हाट यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.महिलांसाठी विविध खेळांचे, कलागुणांचे प्रदर्शन चे आयोजन करण्यात आले होते.

#### महिलांना प्रेरणा देण्याचा प्रयत्न...

राष्ट्रवादी काँग्रेस महिला सेलच्या प्रदेश अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदद पवार, प्रदेश अध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेसच्या "गाथा सन्मानाची" या उपक्रमाद्वारे महिलांना प्रेरणा देण्याचा आणि त्यांच्या मेहनतीचे कौतुक करण्याचा स्तुत्य प्रयत्न करण्यात आला.

---

## 'निर्भय कन्या' अभियानामधून

# महिला सक्षमीकरणाचा नवा अध्याय - डॉ. किर्ती धारवाडकर

### शिक्षण विश्व: एसबीपीआयएम मध्ये निर्भय कन्या अभियान संपन्न

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**विद्यार्थिनींचा आणि समाजातील वंचित घटकांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी निर्भय कन्या अभियान मोठ्या प्रमाणात राबविण्यात आले पाहिजे. यामुळे महिलांचे मनोबल आणि आत्मविश्वास वाढेल. त्यातून त्यांचे व्यक्तिमत्व विकसित होऊन त्या सक्षम नागरिक म्हणून काम करतील, हाच निर्भय कन्या अभियानाचा मुख्य उद्देश आहे असे एसबीपीआयएमच्या संचालिका डॉ. किर्ती धारवाडकर यांनी सांगितले.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने एसबीपीआयएम येथे "निर्भय कन्या अभियान" कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी वरिष्ठ संबंध व्यवस्थापक दिपाली महाजन, सह प्रा.डॉ.काजल माहेश्वरी,डॉ.रूपाली कुदरे आदी उपस्थित होते.

पहिल्या सत्रात 'इंट्रोडक्शन टू द वर्ल्ड ऑफ इन्व्हेस्टमेंट- एक गुंतवणूकदार जागरूकता उपक्रम' या विषयावर दिपाली महाजन यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, व्यवस्थापक, व्यवस्थापकीय बँकिंग आणि राष्ट्रीय वितरण वाहिनीचा अवलंब करून विद्यार्थिनींना जीवनात स्वतंत्रता, वेळेची बचत आणि गुंतवणूक करून करिअर मध्ये स्थिरता कशी आणता येते. विद्यार्थ्यांना पैशांचे व्यवस्थापन आणि विविध आर्थिक साधनांमधील गुंतवणुकीचे महत्त्व सांगितले.

दुसऱ्या सत्रात डॉ. काजल माहेश्वरी यांनी 'वैयक्तिक सुरक्षा' या विषयावर मार्गदर्शन केले. वैयक्तिक सुरक्षा वाढविण्यासाठी लागणारी धोरणे, स्व-संरक्षण तंत्र आणि संभाव्य धोक्यांची जाणीव विद्यार्थिनींना करून दिली. कोणत्याही परिस्थितींमध्ये सुरक्षित राहण्यासाठी काळजी कशी घ्यावी याची उदाहरणे दिली.

समारोप प्रसंगी डॉ. रूपाली कुदरे यांनी 'मानसिक आरोग्य व्यवस्थापन' या विषयावर मानसिक आरोग्य व्यवस्थापनाचे महत्त्व, तणाव व्यवस्थापन तंत्र, जागरूकता, सकारात्मक विचार, स्वत:ची काळजी घेण्याच्या धोरणांवर मार्गदर्शन केले. मानसिक आरोग्याच्या आव्हानांना ओळखण्याच्या आणि त्यांचा सामना करण्याच्या पद्धती समजून सांगितल्या. प्रश्नोत्तराच्या सत्रात विद्यार्थ्यांनी वक्त्यांना गुंतवणूक धोरणे,वैयक्तिक सुरक्षा उपाय आणि मानसिक आरोग्य व्यवस्थापनाशी संबंधित विविध प्रश्न विचारले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी उत्कृष्ट कार्यक्रम राबविल्याबद्दल आयोजकांचे व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.


मोरया शिक्षण संस्था
Computer Vacation Batch
ADMISSIONS OPEN
2025-26
'C' भाषा
₹ १३००/-
'C++' भाषा
₹ १३००/-
बेसिक जावा
₹ १३००/-
स्क्रॅच
ॲनिमेशन
₹ १३००/-
बेसिक टॅली
₹ १५००/-
एम.एस.
ऑफिस
₹ १५००/-
कोरल ड्रॉ
₹ ११००/-
Adobe AB
फोटोशॉप
₹ ११००/-
सर्व कोर्स 20 मार्च 2025 पासून सुरू होत आहेत. इच्छुक पालक, विद्यार्थी व इतर
शाळेतील विद्यार्थ्यांनी खालील नंबरवर संपर्क करून प्रवेश निश्चित करावा.
अथवा शाळेतील संगणक कक्षात येऊन अधिक माहिती घ्यावी.
ठिकाण: संगणक लॅब, व्ही. के. माटे हायस्कूल, चिंचवड. संपर्क : 8087706100

# रंग आणि लेखणीतून जगभरातील घडामोडींवर भाष्य!

## शिक्षण विश्व: पिंपरी चिंचवड कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या अंतर महाविद्यालयीन स्पर्धेला प्रतिसाद

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पोस्टर मेकिंग, निबंध लेखन आणि वक्तृत्व स्पर्धा मधून विद्यार्थ्यांनी सद्यस्थितीवर भाष्य केले. जगभरातील विविध घडामोडी विद्यार्थ्यांनी रंग आणि लेखणीतून व्यक्त केल्या. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळवून दिल्याबद्दल विद्यार्थी आणि पालकांकडून या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करण्यात आले .**




पिंपरी चिंचवड कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, रावेत आणि भारतीय रेड क्रॉस सोसायटी, पुणे जिल्हा शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या आंतरमहाविद्यालयीन पोस्टर मेकिंग, निबंध लेखन आणि वक्तृत्व स्पर्धांचा बक्षी वितरण समारंभ नुकताच संपन्न झाला. या स्पर्धेत पुणे व पिंपरी चिंचवड मधील विविध महाविद्यालयांतील ११० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता.

पारितोषिक वितरण समारंभाला उपस्थित पाहुणे डॉ. आबासाहेब शिंदे, प्राचार्य डॉ. स्मृती पाठक, कार्यक्रम समन्वयक प्रा. देवेंद्र देसाई, प्रा. सुप्रिया कुलकर्णी आणि एस. बी. पाटील सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, रावेतचे प्राचार्य संदीप पाटील यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

पोस्टर स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून सुवर्णा शिंदे, अश्विनी साळवे, निबंध लेखन स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. शेळके, प्रा. अमृता दीक्षित आणि वकृत्व स्पर्धेसाठी प्रा. स्वाती पाटील, प्रा. रोहित वरवंडकर यांनी काम पाहिले. प्रास्ताविक प्रा. इशप्रीत कौर, सूत्रसंचालन प्रा. देवेंद्र देसाई व आभार प्रा. सुषमा पिंपळखरे यांनी मानले.

विजेत्यां विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह, रोख बक्षीसे व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि भारतीय रेड क्रॉस सोसायटी, पुणे जिल्हा शाखेचे सहकार्य मिळाले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

2025-26
ADMISSIONS
OPEN

PRIYADARSHANI
SCHOOL, ALANDI

42 YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION

50 FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS

Contact Us Now
86687 55826
98232 31705

Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105



# पीएचडी मार्गदर्शकांकडून होताहेत गैरव्यवहार!

## आमदार शंकर जगताप: विधानसभेत राज्य सरकारचे लक्ष वेधले!

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पीएचडी मार्गदर्शक आणि सांगवी येथील बाबुराव घोलप महाविद्यालयातील अर्थशास्त्राच्या प्राध्यापिकेने पीएचडी विद्यार्थ्यांकडून लाच घेतल्याच्या प्रकरणावर विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात चर्चा झाली. आमदार शंकर जगताप यांनी या संदर्भात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांना प्रश्न विचारले. पीएचडी मार्गदर्शकांकडून होणारे गैरव्यवहार रोखण्यासाठी कठोर उयोययोजना करावी, अशी आग्रही मागणी आमदार जगताप यांनी केली.**



आमदार शंकर जगताप यांनी विचारलेल्या प्रश्नांमध्ये संबंधित प्राध्यापिकेच्या अटकेसह, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवरील नियंत्रण, विद्यार्थ्यांची गैरसोय, आणि पीएचडी मार्गदर्शकांकडून होणाऱ्या गैरप्रकारांवर सरकारने कोणती पावले उचलली आहेत, या महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश होता.

या प्रश्नांना उत्तर देताना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी संबंधित प्राध्यापिकेच्या अटकेची घटना खरी असल्याचे मान्य केले. मात्र, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवर नियंत्रण नसल्याने विद्यार्थ्यांची छळवणूक होते, हा आरोप फेटाळला. तसेच, संशोधन केंद्रांमध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याचा मुद्दाही त्यांनी नाकारला. पुढील उपाययोजनांबाबत माहिती देताना मंत्रीमहोदय म्हणाले की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑनलाईन पोर्टलवर 'पीएचडी ट्रॅकिंग प्रणाली' कार्यान्वित करण्यात आली असून, विद्यार्थ्यांना त्यांच्या अडचणींबाबत तक्रार नोंदविण्याची सुविधा देण्यात आली आहे. तसेच, विद्यापीठाकडून सर्व संशोधन केंद्रांचे शैक्षणिक व प्रशासकीय लेखापरीक्षण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना संशोधनासाठी आवश्यक सोयीसुविधा पुरवणे हे संशोधन केंद्रांना बंधनकारक करण्यात आले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणाच्या चौकशीसंदर्भात विद्यापीठाने आवश्यक ती माहिती संकलित केली असून, शासनस्तरावरही कार्यवाही करण्यात येत असल्याचे चंद्रकांतदादा पाटील यांनी सभागृहात सांगितले. या चर्चेदरम्यान, पीएचडी मार्गदर्शकांकडून होणाऱ्या गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. तसेच, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवरील देखरेख अधिक सक्षम करण्याची गरज असल्याचे आमदारांनी अधोरेखित केले.

